# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २०७-२३** **दिनांक : - ०६/०७/२०२३**

## चैन स्नॅचिंग करणाऱ्या सराईत आरोपीतांना अटक- माणिकपुर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक ३०/०६/२०२३ रोजी तक्रारदार श्रीमती गीता उल्हास अयुर, वय ५३ वर्षे या कामावरुन घरी परत येत असताना २१.१५ वा. चे सुमारास अंबाडी सिग्नल, वसई पश्चिम या ठिकाणी दोन अनोळखी इसमांनी दुचाकी मोटर सायकलवरुन येवुन फिर्यादी यांच्या गळयातील सोन्याची चैन त्यांना धक्का मारुन जबरदस्तीने खेचुन जबरी चोरी करुन अंबाडी सिग्नल येथुन वसई गावाच्या दिशेन पळुन गेलेबाबत वर नमुद फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने माणिकपुर पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I २५२/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ अन्वये दिनांक ३०/०६/२०२३ गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचे अनुषंगाने माणिकपुर पोलीस ठाणेतील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सि.सि.टि.व्ही. कॅमेरे व तांत्रिक विश्लषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपी नामे १) अतुल रामजी व्दिवेदी, वय २० वर्षे, रा. गोलीवाडी चाळ, सेक्टर ३, जिवेणी धाम मंदिराजवळ, करंजाडे, पनवेल, जि. रायगड, २) राहुल रवि शर्मा, वय २९ वर्षे, रा. सिरवी प्लाझा, प्लॉट नं. २५, सेक्टर २, कारंजेवाडे, पनवेल, जि. रायगड यांना ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक ०२/०७/२०२३ रोजी सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडुन गुन्हयात जबरी चोरी केलेली १८,०००/- रुपये किंमतीची ६ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन व गुन्हया करते वेळी वापरलेली ८०,०००/- रुपये किंमतीची सुझुकी जिक्सर मोटार सायकल असा एकुण ९८,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक आरोपीतांकडे अधिक तपास करता त्यांनी त्याच दिवशी तुळींज पोलीस ठाणे हद्दीमध्ये गुन्हा रजि. क्र. ४८३/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३९२,३४ केला असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर कामगिरी श्रीमती पौणिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, वसई, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली माणिकपुर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संपतराव पाटील, गुन्हे प्रकटीकरण पथकातील स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. तुकाराम भोपळे, पो.हवा. शैलेश पाटिल, धनंजय चौधरी, शामेश चंदनशिवे, अनिल चव्हाण व पो.अंम. प्रविण कांदे यांनी केलेली आहे.

----0000---